नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०१/२०२६ (सोमवार)**

---

## मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या १५० दिवसांचा ई —गव्हर्नन्स सुधारणा मुल्यमापन कार्यक्रमा मध्ये पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण यांची महाराष्ट्रातून दुसऱ्या क्रमांकाने निवड

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी 'क्षेत्रीय कार्यालयांसाठी १५० **दिवसांचा ई—गव्हर्नन्स सुधारणा मुल्यमापन** हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांचा समावेश होता. या १५० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे मुल्यमापन हे **'भारतीय गुणवत्ता परिषद'** (Quality Council Of India) या संस्थे मार्फत करण्यात आले. त्यामध्ये पोलीस विभागा अंतर्गत संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन सर्वोत्तम ५ पोलीस अधीक्षक कार्यालय यांची निवड करण्यात आली असुन **पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण ने संपुर्ण राज्यातुन २०० पैकी १६१ गुण मिळवुन व्दितीय क्रमांक मिळविला आहे.**

या विशेष मोहिम अंतर्गत १) कार्यालयाचे संकेतस्थळ , २) आपले सरकार प्रणाली, ३) ई—ऑफीस, ४) कार्यालयाचा डॅशबोर्ड, ५) व्हॉट्सअॅप चॅटबॉट आणि ६) अभिनव प्रकल्प अशा मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. नागपूर ग्रामीण पोलीस घटकाच्या वतीने या उपक्रमा अंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्टे १०० टक्के पुर्ण करून पारदर्शक, लोकाभिमुख आणि आधुनिक पोलिसींगच्या दिशेने महत्वपुर्ण कामगिरी केली आहे.

**यापुर्वी सुध्दा मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमामध्ये नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाने व्दितीय क्रमांक मिळविला होता. आयुक्तालय श्रेणीत ठाणे पोलीस आयुक्तालय आणि जिल्हा श्रेणीत नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालय या राज्यातील एकमेव दोन पोलीस आस्थापना आहेत, ज्यांनी दोन्ही उपक्रमांमध्ये पुरस्कार प्राप्त केला आहे.**

**या उपक्रमाअतर्गत पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण यांनी खालील मुद्दंयावर विशेष कार्यवाही केली आहे.**

**कार्यालयाचे संकेतस्थळ**:— nagpurgraminpolice.gov.in हे नागपूर ग्रामीण पोलिस दलाचे अधिकृत संकेतस्थळ आहे. संकेतस्थळमध्ये **(WhatsApp AI Chatbot)** व्हॉट्सॲप चॅटबॉट समाविष्ट असुन याद्वारे नागरिकांना संकेतस्थळ वापरण्यासाठी सुलभता प्रदान करण्यात आली आहे. नागरिकांसाठी तक्रार, सूचना व सेवा—संबंधित माहितीकरिता एक प्रभावी संवाद माध्यम असुन चॅटबॉट मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषांमध्ये वापरता येतो. दिव्यांग नागरिकांसाठी सुध्दा Voice Search ही विशेष सेवा पुरविण्यात आली आहे.

**MahaCrimeOS AI Copilot** :— नागपुर ग्रामीण पोलीस दलात MahaCrimeOS AI Copilot चा गुन्हयाचा तपासात वापर करण्यात येत असुन जिल्हयातील १२७ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. २६० हून अधिक प्रकरणांच्या तपासात जलद गतीने तपास करून याचा यशस्वी वापर करून गुन्हे उघड करण्यात आले आहे.

**अभिनव प्रकल्प (Innovative Project )**

**अभिनव प्रकल्प १** :— AI/Blockchain/DigiLocker द्वारे Secured Muddemal Automation & Retrieval Technology (SMART) या तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षितरित्या मुद्देमालाच्या नोंद घेण्यात येत आहे.

**अभिनव प्रकल्प २** :— GIS / Remote Sensing /Locational Services या तंत्रज्ञानाचा नाविन्यपूर्ण वापर करून MARVEL द्वारे टेलिकॉम डेटा मॅपिंग द्वारे नागपूर ग्रामीण अंतर्गत Data चा वापर करून Behavioral Analysis (वर्तनात्मक विश्लेषण) प्राप्त करण्यात येते, २. तांत्रिक पुरावे बाबत GIS चा वापर करून Mapping करण्यात येते. ३. Behavioral Pattern आणि Aberrational Pattern ओळखता येतात. ४. Face detection, Object Detection ( Weapons and suspicious objects) मुळे या प्रकल्पाचा प्रभावी वापर करून जिल्हयात एकूण ०८ केसेसमध्ये MCOCA कारवाई आली आहे.

**GIS/Remote Sensing /Locational Services चा नाविन्यपूर्ण वापर** Smart Beat Patrolling Monitoring System GIS मॅपिंग व ट्रॅकिंग द्वारे जिल्हास्तरीय, उपविभाग व पोलीस ठाणे स्तर अशी त्री—स्तरीय रचना असून याद्वारे पर्यवेक्षण होते. GIS द्वारे महत्त्वाचे ठिकाणांवर लक्ष ठेवण्यात येते.कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने सदर प्रणालीचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.

**आपले सरकार प्रणाली** :—'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत चरित्र पडताळणी, पासपोर्ट पडताळणी सेवा, तसेच इतर संबंधित सेवांसाठी उपलब्ध आहे. सदर पोर्टलबाबत दुर्गम भागातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आल्याने दुर्गम भागातील नागरिकांनी सदर प्रणालीच्या सेवांचा लाभ घेतला आहे.

**आज दिनांक २६/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नागपूर येथील कस्तुरचंद**

पार्क मैदानावर झालेल्या प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण समारंभात १५० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहीम अंतर्गत पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण यांची द्वितीय क्रमांकाने निवड झाल्याबाबत मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांना पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले.



Government of Maharashtra

भारतीय गुणवत्ता परिषद
QUALITY COUNCIL OF INDIA
QCI
Creating an Ecosystem for Quality

# कार्यालयीन मूल्यमापन

## १५० दिवसांचा ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम

*सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील शासकीय कार्यालये*

### सर्वोत्तम जिल्हाधिकारी (३६ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, जळगाव | १८८.०० |
| २ | जिल्हाधिकारी, ठाणे | १८६.७५ |
| ३ | जिल्हाधिकारी, धाराशिव | १८५.२५ |
| ४ | जिल्हाधिकारी, लातूर | १७९.२५ |
| ५ | जिल्हाधिकारी, कोल्हापूर | १७७.०० |

### सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी (३४ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|

**या श्रेणीतील निकाल ८ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात येतील**

### सर्वोत्तम पोलीस अधीक्षक (३४ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|
| १ | पोलिस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) | १६८.२५ |
| २ | पोलिस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण) | १६१.०० |
| ३ | पोलिस अधीक्षक, अकोला | १४८.७५ |
| ४ | पोलिस अधीक्षक, पुणे (ग्रामीण) | १४५.०० |
| ५ | पोलिस अधीक्षक, रत्नागिरी | १४४.२५ |

### सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त (२९ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका आयुक्त, पनवेल | १८७.७५ |
| २ | महानगरपालिका आयुक्त, पुणे | १८६.२५ |
| ३ | महानगरपालिका आयुक्त, उल्हासनगर | १८४.२५ |
| ४ | महानगरपालिका आयुक्त, नवी मुंबई | १८१.७५ |
| ५ | महानगरपालिका आयुक्त, अमरावती | १७९.५० |

### सर्वोत्तम विभागीय आयुक्त (६ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त, नागपूर | १५९.५२ |
| २ | विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर | १५२.३८ |

### सर्वोत्तम पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक / उपमहानिरीक्षक (८ पैकी)

| क्रमांक | कार्यालयाचे नाव | सामान्यीकृत गुण (२०० पैकी) |
|---|---|---|
| १ | परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक, नांदेड | १२१.२३ |
| २ | परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक, नागपूर | १२०.८८ |

२६ जानेवारी २०२६

# ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमीत्य नागपूर ग्रामीण पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी यांचा सत्कार

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा.श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी कस्तुरचंद पार्क मैदानावर प्रजासत्ताक दिनी उल्लेखनीय कामगिरीसाठी नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील **१) उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पराग बाबुराव पोटे, काटोल उपविभाग आणि २) पोलीस निरीक्षक श्री. कैलास रामजी बाराभाई, बिनतारी संदेश विभाग, नागपूर ग्रामीण यांना त्यांच्या उत्कृष्ट, प्रामाणिक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी मा. राष्ट्रपतीं, भारत सरकार यांनी, गृह मंत्रालयामार्फत (Meritorious Service Medal – MSM) गुणवत्तापूर्ण सेवा पदक प्राप्त झाल्याने** त्यांना पुष्पगुच्छ देवुन सन्मानित करण्यात आले. तसेच सिव्हील लाईन येथील पोलीस भवन येथे ध्वजारोहण समारंभा दरम्यान मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांच्या हस्ते वरील नमुद अधिकारी यांना सन्मानित करण्यात आले.

**मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी वर नमुद अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.**





## कस्तुरचंद पार्क (के.पी.) मैदानावर प्रजासत्ताक दिन थाटात साजरा. नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या परेड पथकाला उत्कृष्ट परेड बाबत तृतीय पारीतोषीक

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमीत्य दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा आज दिनांक २६/०१/२०२६ रोजी नागपूर येथील कस्तुरचंद पार्क मैदानावर ध्वजारोहन व परेड चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सदर परेड मध्ये नागपुर ग्रामीण जिल्हा आस्थापनेवरील पोलीस मुख्यालय येथील ३० पोलीस अंमलदारचे पथक सामिल होते. सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्हयाचे पालकमंत्री मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी परेड मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे तसेच परेड चे निरीक्षण केले. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील परेड पथकाने उत्कृष्ट परेड केल्याने त्यांना तृतीय क्रमांकाचे

पारितोषीक प्राप्त झाले. सदर कार्यक्रमात नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नागपुर ग्रामीण पोलीस दलाच्या परेड पथकाला पारीतोषीक देवुन सन्मानित केले.



# २३.८४ ग्रॅम वजनाचा ०२ लाख ३४ हजार २०० रूपयांचा अंमली पदार्थ ( मेफेड्रोन पावडर) जप्त, २ आरोपी अटक
# नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी —** दिनांक २५/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक नागपुर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) देवाण घेवाण होणार आहे. नमुद पथकाने सदर माहीती बुटीबोरी पोलीसांना देत बोरी पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद आरोपी शोध कामी सतर्क पेट्रोलींग केली. बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीत वाकेश्वर फाटा ,नागपुर ते चंद्रपुर रोडवर काही ईसम हे संशयास्पदरित्या एका चहा टपरीचे आडोशास मोटरसायकलवर थांबुन दिसल्याने नमुद इसमांना पोलीसांनी शिताफिने पकडुन त्याचे नाव पत्ता विचारले असता **आरोपी १) शुभम वामनराव ढोबळे, वय. २९ वर्षे, २) जयेश राजेश नगराळे, वय. १९ वर्षे, दोघे रा. चंद्रमणी नगर, अजनी, ता.जि.नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची झडती घेतली त्यांचेकडे अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर मिळुन आला. आरोपीतांकडुन पंचासमक्ष एम.डी (मेफेड्रोन) पावडर वजन २३.८४ ग्रॅम किंमती १,१९,२००/—रूपये, मोबाईल , मोटारसायकल असा एकुण २,३४,२००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपींना अटक करण्यात आली आहे.**




## बस स्टँड सावनेर येथे प्रवाशी महीलेचे दागिने चोरणा—या अज्ञात ६ महीला आरोपीतांच्या टोळीचा २ तासाच्या आत शोध , ५ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त
## सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर:—** पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत दिनांक २६/०१/२०२६ रोजी फिर्यादी नामे सौ. पल्लवी राजु मिरचे, वय ३० वर्ष, रा. मस्के ले आउट, खापा रोड, रेल्वे फाटक चे मागे, सावनेर ता. सावनेर जिल्हा नागपुर यांनी तक्रार दिली की, फिर्यादी ही आपले परीवारासह नागपुर येथे कार्यक्रमाकरीता जाण्या करीता बस स्टॅन्ड सावनेर येथे पोहचली असता फिर्यादीच्या हॅडबॅगमधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरी केले. तसेच त्याच बसमधील अजुन एका महीला प्रवाशी यांचे सुध्दा पर्स मधुन दागिने आणि नगदी अज्ञात चोरट्यांनी चोरी केले.अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन सावनेर येथे चोरीचा गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांना

अशी माहीती प्राप्त होताच त्यांनी तात्काळ बस स्टॅड येथे तपास पथक रवना केले. नमुद गुन्हयात महीला आरोपी असल्याच्या संशयावरून त्या दिशेने तपास सुरू करण्यात आला असता नमुद ०६ महिला आरोपी या नागपुर च्या दिशेने रवाना झाल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी नागपुर च्या दिशेने जाणारी वाहने तपासली असता नागमंदीर सावनेर जवळ एका नागपुर कडे जाणा—या ऑटोमध्ये संशयीत ०६ महिला आरोपी मिळुन आल्याने यांना ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याबाबत कबुली दिली.

पोलीसांनी नमुद आरोपींकडुन गुन्हयात चोरीस गेलेले अंदाजे ५ तोळे ४ ग्रॅम सोन्या दागिने आणि चांदीचे दागीने किंमती ५,५४,५००/— रूपयांचा असा संपुर्ण मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, २ वाहनांसह ६५ लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक २३/०१/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा पोस्टे टी पाईट भिवापुर येथे नाकाबंदी करून खालील प्रमाणे दोन गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रं १ :—** ट्रक क्र एम एच .४०सी एन. ७११६ या वाहनला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली.**चालक निखील शंकरराव भुरे, वय ३७ वर्ष, रा. वाठोडा ता. नागपुर जि. नागपुर हा मिळुन आल्याने** त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत तसेच

नमुद वाहन त्याचेच मालकीचे असल्याची माहीती सुध्दा प्राप्त झाली. वाहन आणि त्यामधील ३ ब्रास रेती जप्त करण्यात आली.

**कारवाई क्रं २** :— ट्रक क्र एमएच .३२ ए जे २९९९ या वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. त्यावेळी क्रेटा कार क्रं एम एच ४० डी ई २२३५ हे वाहन रेती वाहतुक करणाऱ्या वाहनाच्या मागे मागे राहुन मदत करीत असल्याचे निदर्शनास आले. नमुद वाहन चालक हा पोलीसांना पाहुन वाहनासह पळुन गेला. **चालक श्रेयस सुधीर रामटेके, वय २१ वर्ष, रा. शिरसाळा, ता. पवनी जि. भंडारा सोबत ३) क्लिनर प्रज्वल विनोद गायकवाड, वय २२ वर्ष, रा. कोरंभी, ता. पवनी, जि. भंडारा हे मिळुन आले. त्यांचे कडे रेती वाहतुकीचा परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली. वाहन** मालकाबाबत विचारपुस केली असता **वाहन मालक नामे प्रज्वल यादव रोहणकर, वय २३ वर्ष रा. पवनी, ता. पवनी, जि. भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. तसेच आरोपी क्रं ४. क्रेटा कार क्रं एम एच ४० डी ई २२३५ चा चालक अमन अरोरा रा. भिवापुर ता. भिवापुर जि. नागपुर हा असल्याचाी माहीती प्राप्त झाली.** वाहन आणि त्यामधील ६ ब्रास रेती जप्त करण्यात आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने किमती ६५,००,०००/—रूपये आणि वाहन क्रं १ आणि २ मधुन एकुण ०९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ६५,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३ (२), ४९, ३(५) भा.न्या. सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. **अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन नरखेड येथे दिनांक २५/०१/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटर सायकलने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोहदी दळवी हेटी येथे नाकाबंदी केली असता होंडा लिओ मोटरसायकल क्र. एम एच ४०/बि डी ६६८७ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे सुरज धनराज ठवरे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं १२, नरखेड, तह. नरखेड जिल्हा नागपूर** हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) २५० देशी दारूच्या निपा किंमती १०,०००/— रूपये आणि होंडा लिओ निळया रंगाची मोटरसायकल क्र. एम एच ४० बि डी ६६८७ किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण किंमती ६०,०००/— रुपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २१ गुन्हे नोंद

दिनांक २५/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ७८,९८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत ०६ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत ०४ गुन्हे नोंद आहे. असे एकुण महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २१ गुन्हे दाखल केले आहे.**

# पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मालची बानोर फाटा येथील अतिक्रमण प्रकरणाबाबत

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत येणार—या मालची बानोर फाटा ता. कुही. येथील श्रीमती कुलवंता प्रेमदास बोरकर व त्यांचे परिवाराचे बानोर ग्रामपंचायतीचे जागेवर अतिक्रमण केल्याने, त्यांचे अतिकमीत जागेवरील घर ग्रामपंचायतीने शासकीय कार्यवाही करून अतिक्रमण काढल्याने सदर अतिक्रमीत कुटुंबाने सरपंच व ग्राम सचिव बानोर ग्राम पंचायत यांचेवर कायदेशिर कारवाई करणेबाबचा निवेदन अर्ज पो.स्टे. कुही येथे दिल्याने सदर निवेदन अर्जा संबंधाने चौकशी मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड हे करीत असुन ३ दिवसात चौकशी करून अहवाल चौकशी अहवाल मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना सादर करण्यात येणार आहेत.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने